## भाग अ

| | |
|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली यांचे न्यायालयात</u>**<br>**(पिठासीन अधिकारीः– एम.ए.कुलकर्णी )**<br>स्वीकारल्याचा दिनांक – ०३.१२.२०१९<br>नोंदणी दिनांक – ०३.१२.२०१९<br>निकाल दिनांक – ०२.०५.२०२६<br>कालावधी **– ०६ वर्षे ०४ म. २९दि.**<br>निशाणी क्रमांक –३४<br>**<u>नियमित फौजदारी खटला क्र. १८९/२०१९</u>**<br>MHSN070010372019<br>कवठे महांकाळ पोलीस स्टेशन गु.र. नंबर – ३३५/२०२० |
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत कवठेमहांकाळ पोलीस ठाणे, कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | सहाय्यक सरकारी अभियोक्ता.<br>श्री. जे. जे. पाटील. |
| आरोपीं | १.नितीन रामगोंडा पाटील<br>वय – ४० वर्षे धंदा – शेती<br>२.दिपाली नितीन पाटील<br>वय– ३५ वर्षे धंदा–घरकाम<br>रा. ढालगांव. ता. कवठे महांकाळ, जि. सांगली |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. एच.आर. पाटील |

**भाग ब**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याची तारीख | ११.१०.२०१९ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | १२.१०.२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २५.११.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १३.०२.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | ०४.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवलेली तारीख | .... |
| न्यायनिर्णय दिलेली तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख , असल्यास | ---- |

**<u>आरोपींची माहिती</u>**

| अ. क्र. | आरोपींचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अपराध कलम | सोडून दिले किंवा शिक्षेचा तपशील | ठोठावलेली शिक्षा | संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्यास त्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नितीन रामगोंडा पाटील | १३.१०. २०१९ | ०३.१२. २०१९ | ३२४, ५०४, सह कलम | निर्दोष मुक्तता | निरंक. | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३४ भादंवि. | | | |
| २ | दिपाली नितीन पाटील | १४.१०. २०१९ | .... | ३२४, ५०४, सह कलम ३४ भादंवि. | निर्दोष मुक्तता | निरंक. | निरंक |

**भाग क**

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष /न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| PW1 | वासुदेव नंदकुमार जबडे | फिर्यादी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार , असल्यास :**

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| DW1 | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार , असल्यास :**

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| CW1 | – | – |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष /न्यायालयीन निशाणी क्रंमाकाची यादी

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्रं. | निशाणी क्रंमाक | वर्णन |
|---|---|---|
| 1. | -- | ---- |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्रं. | निशाणी क्रंमाक | वर्णन |
|---|---|---|
| 1. | - | - |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रं. | निशाणी क्रंमाक | वर्णन |
|---|---|---|
| 1. | निशाणी २३ | फिर्याद |
| २ | निशाणी २४ | प्रथम खबर अहवाल |

**ड. जप्त मुद्देमाल:**

| अ.क्रं. | वस्तु क्रंमाक | वर्णन |
|---|---|---|
| 1. | - | एक लोखंडी रॉड त्याची लांबी ३५ इंच व रुंदी १ इंच |

## न्या य नि र्ण य

(दि.०२.०५.२०२६ रोजी जाहीर )

आरोपींवर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४ व ५०४ भारतीय दंड संहिता, १८६० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून खटला

चालविणेत आला आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,</u>**

**०२.** दि. ११.१०.२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांची सावत्र बहिण दिपाली व तिचा पती नितीन यांच्यात घर वाटणीच्या कारणावरुन वाद होवून आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. त्याबाबत त्यांनी कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. सदरची तक्रार दिल्याचे आरोपींना माहिती झाल्याने फिर्यादी रात्री १०.०० वाजताच्या दरम्यान त्यांच्या घरी गेले असता आरोपी नितीन याने फिर्यादीस 'तु आमच्या विरोधात पोलीस ठाण्यास तक्रार का दिलीस' असे म्हणून फिर्यादीस लोखंडी रॉडने पाठीवर, गुडघ्यावर, मानेवर मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीची आई भांडण सोडविण्यास आली असता आरोपींनी तिलाही लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरूध्द कवठे महांकाळ पोलिस स्टेशन येथे भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ अन्वये फिर्याद नोंदवली.

**०३.** वरील अपराधाच्या अनुषंगाने कवठे महांकाळ पोलीसांनी गु.र.क्र. ३३५/२०१९ नोंदवला. सदर खटल्याचा तपास पोलीस हवालदार श्री. एस. डी. पडळकर यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपींनी अपराध केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द भादंवि कलम ३२४

व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केला.

**०४.** आरोपींना दोषारोप (नि. क्र. १२) त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त केली.

**०५**. आरोपींविरुध्दचा अपराध शाबीत करण्याकामी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ वासुदेव नंदकुमार जबडे (फिर्यादी) यास निशाणी २२ वर तपासले आहे. त्यानंतर नि. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**०६.** अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपींविरुध्दचा पुरावा आढळून आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन नि.क्र. २८ व नि.क्र. २९ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला. फिर्यादीतर्फे निशाण २५ वर पुरसिस देवून त्यास जादा लेखी व तोंडी पुरावा बचावाकामी दयावयाचे नसल्याचे कथन केले.

**०७.** अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा आणि दोन्ही बाजुचा युक्तिवाद यांचा विचार करता पुढील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खाली दिलेले आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, | |

| | | |
|---|---|---|
| | ११.१०.२०१९ रोजी ढालगांव, ता. कवठे महांकाळ येथे आरोपींनी समान उददेशाने फिर्यादीस लोखंडी रॉडने पाठीवर, गुडघ्यावर, मानेवर मारुन दुखापत केली आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहीता, १८६० च्या कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी |
| २ | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उददेशाने फिर्यादी यांचा उद्देशपुर्वक अपमान करून त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असे कृत्य केले आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहीता, १८६० च्या कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराध केला? | नकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**०८.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले.

**मुद्दे क्र. १ व २ बाबत : –**

**०९.** सदर मुद्दे हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे व आलेला पुरावा लक्षात घेता चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरिता कारणेमिमांसेकरिता एकत्रीत घेण्यात येत

आहेत.

**१०.** आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरता अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र. १ वासुदेव नंदकुमार जबडे (निशाणी २२) वर तपासले आहे. साक्षीदार क्र. १ ने त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटनेची तारीख त्यांना आठवत नाही. घटना सन २०१९ साली रात्रीच्यावेळी ढालगांव येथील त्यांच्या घरामध्ये घडली होती. आरोपी व त्यांच्यामध्ये रात्रीच्या लाइट लावण्यावरुन वाद झाला होता, या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर घटनेबददल त्यांनी आरोपींविरुध्द पोलीसात तक्रार दिल्याचे त्यांनी मान्य केले.

**११.** सदरहू साक्षीदार याने उलटतपासात मान्य केले की, त्यांना मारहाण झालेली नव्हती. आरोपी व त्यांच्यामध्ये दिवाणी स्वरुपाचा वाद होता. सदर साक्षीदाराने मान्य केले की गैरसमजूतीतून त्यांनी नि.क्र. २३ व २४ वरील तक्रार दिली होती. सदर साक्षीदाराने पुढे कथन केले आहे की, आरोपीं व त्याच्यामध्ये आपसात न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१२.** सदर खटल्यातील फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांना मारहाण झालेली नसून त्यांनी गैरसमजूतीतून नि.क्र. २३ व २४ वरील तक्रार दिल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र. १ वासुदेव यांनी निशाणी क्र. २५ वर पुरसीस दाखल करुन यापूढे साक्षीदार तपासणे नाही असे कळवलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी मधील वाद न्यायालयाबाहेर

मिटलेला आहे. अशा परिस्थितीत अधिकचा पुरावा घेवून वेळ घालवणे उचित होणार नाही. सबब नि. क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला होता.

**१३.** अभिलेखावरील पुरावा विचारात घेता अभियोग पक्षाने आरोपींनी फिर्यादीस लोखंडी रॉडने पाठीवर, गुडघ्यावर, मानेवर मारुन दुखापत केली, फिर्यादीचा उद्देशपुर्वक अपमान करून प्रक्षोभित केले हे शाबित करणे आवश्यक होते. फिर्यादीने त्याच्या उलटतपासात आरोपींनी त्यांना मारहाण झाल्याचे नाकारले असून त्याने गैरसमजूतीतून आरोपींविरुध्द फिर्याद दिल्याचे मान्य केले आहे. निशाणी २७ वरील वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता दि. १२.१०.२०१९ रोजी फिर्यादीस दुखापत झाल्याचे दिसून येते. परंतु, स्वतः फिर्यादी सा.क्र १ ने, त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ तक्रार झाल्याचे व आरोपीने त्यांना मारहाण केली नसल्याचे उलटतपासादरम्यान कथन केले आहे. त्यामुळे सदरील दुखापती या आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे झाल्या होत्या ही बाब शाबित होत नाही.

**१४.** फिर्यादीने निशाणी २५ वर पुरसिस दाखल करून त्यास जादा साक्षीदार तपासावयाचे नसल्याचे कथन केले आहे. सा.क्र. १ वासुदेव याने जरी फिर्याद नि.क्र. २३ मधील मजकूर बरोबर असल्याचे म्हंटले तरीही उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की फिर्याद नि.क्र.२३ व २४ मध्ये नमूद मजकुराप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. त्यामुळे आरोपींवर ठेवण्यात आलेले दोषारोप शाबित होत नाहीत.

**१५.** वरील सर्व परिस्थितीचा विचार करता आरोपींविरूध्द सबळ तोंडी अथवा लेखी पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. अशा प्रकारे आरोपींविरूध्द अपराध शाबीत होणेकरिता सबळ पुरावा अभिलेखावर आला नाही. सबब उपरोक्त चर्चेच्या अनुषंगााने मी मुद्दा क्रं. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत :–**

**१६**. वरील बाबींचे विवेचन करता, आरोपींविरूध्द साक्षीदार यांनी फिर्यादीस सुसंगत व गुन्हा सिध्द होणे करिता सबळ असा कोणताही पुरावा दिला नसल्याकारणाने अभियोग पक्ष आरोपींवरील दोषारोपीत अपराध शाबीत करू शकला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. परिणामी मी मुद्दा क्रं. ३ च्या उत्तराकरिता खालील आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

**१.** आरोपी क्र. १ नितीन रामगोंडा पाटील व आरोपी क्र. २ दिपाली नितीन पाटील , रा. ढालगांव, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींचा जामीन कदबा व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

**३.**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ च्या

अनुपालनाकरिता आरोपींनी दिलेले बंधपत्र आणि जमानतपत्र आजरोजी पासुन पुढील सहा महिन्याकरीता अंमलात राहतील.

**४.** प्रस्तुत खटल्यातील जप्त मुददेमाल एक लोखंडी रॉड ज्याची लांबी ३५ इंच व रुंदी १ इंच अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

**५.** सदर न्यायानिर्णयाची एक प्रत जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३६५ अन्वये पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला.)

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.05.02 15:54:07 +0530

**ठिकाणः– कवठेमहांकाळ.** **(एम. ए. कुलकर्णी)**

**दिनांकः– ०२.०५.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कवठेमहांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H P Haridas<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 02.05.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 02.05.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 02.05.2026 |